सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९

# मुंबई वजने व मापे (अंमलबजावणी) अधिनियम, १९५८

(दिनांक १० जुलै, २००६ पर्यंत सुधारित)

# THE BOMBAY WEIGHTS AND MEASURES (ENFORCEMENT) ACT, 1958

**(As modified upto 10th July, 2006)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : ०९.१० रुपये ]

S (H) 733

# मुंबई वजने व मापे (अंमलबजावणी) अधिनियम, १९५८

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे | पृष्ठ क्रमांक


### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ ... १

२. व्याख्या ... २

### प्रकरण दोन

### प्रमाणभूत वजने व मापे

३. चालू प्रमाणे ... ३

४. दुय्यम प्रमाणे ... ४

५. नमुनेवजा प्रमाणे ... ४

६. वजन करण्याची व मापण्याची प्रमाणभूत साधने ... ४

७. प्रमाणभूत वजने व मापे यांव्यतिरिक्त इतर वजने व मापे वापरण्यास मनाई ५

८. विवक्षित बाबतीत केवळ वजने किंवा केवळ मापे वापरण्यास सांगण्याचा अधिकार ५

### प्रकरण तीन

### वजने व मापे बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहणे व त्यांवर शिक्का वठविणे

९. व्यापारविषयक वजने व मापे यांवर संज्ञांची निशाणी करणे ... ५

१०. शिक्का न वठवलेली वजने किंवा मापे यांच्या विक्रीस मनाई ... ६

११. शिक्का न वठविलेली व्यापारविषयक वजने किंवा मापे वापरण्यास मनाई ६

१२. माफी देण्याचा राज्य शासनाचा अधिकार ... ६

१३. लायसेन्साशिवाय वजने व मापे तयार करणे, वगैरेस मनाई ... ६

१४. सीलबंद डबे, वगैरेतील वस्तूंचे वजन किंवा माप लिहिणे ... ६

१४-क. प्रमाणभूत वजने व मापे याखेरीज करून इतर कोणत्याही स्वरूपात कोणत्याही वस्तूची किंमत सांगण्यास किंवा परिमाण दर्शविण्यास मनाई. ७

१५. नियंत्रक, उप-नियंत्रक, सहायक नियंत्रक व निरीक्षक यांची नेमणूक ... ७

१६. निरीक्षकांकडून पडताळणी आणि शिक्का वठविणे ... ८

१७. तपासणे, वगैरेचा अधिकार ... ८




S (H) 733

## अनुक्रमणिका--चालू

### प्रकरण तीन--चालू


१८. वजने किंवा मापे नीट करण्याचा निरीक्षकाचा अधिकार ... ९

१९. माल तयार करणारे, वगैरेनी दफ्तरे व कागदपत्रे ठेवणे ... ९

२०. अपिले ... १०

२१. फी आकारणे ... १०

२२. योग्य रीतीने शिक्का वठवलेली वजने व मापे यांची वैधता ... १०


### प्रकरण चार--शास्ति


२३. प्रमाणभूत वजन किंवा माप याव्यतिरिक्त इतर वजनाने किंवा मापाने विकण्याबद्दल किंवा स्वाधीन करण्याबद्दल किंवा कोणत्याही वस्तुमानाचा किंवा मापाचा घटक ठेवल्याबद्दल शास्ती. ११

२४. शिक्का न वठविलेली व्यापारविषयक वजने व मापे विकण्याबद्दल शास्ती ११

२५. शिक्का न वठविलेली व्यापारविषयक वजने व मापे वापरण्याबद्दल किंवा कब्जात ठेवण्याबद्दल शास्ती. ११

२६. कलम ८ चे उल्लंघन करून वजन किंवा माप वापरल्याबद्दल शास्ती १२

२७. लायसनवाचून वजन, वगैरे तयार करण्याबद्दल, दुरुस्त करण्याबद्दल किंवा विकण्याबद्दल शास्ती. १२

२८. सीलबंद डब्यांवर, वगैरे वजन किंवा माप लिहिण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती १२

२८-क. कलम १४-क चे उल्लंघन करून प्रमाणभूत वजन व मापे याखेरीज करून इतर कोणत्याही स्वरूपात किंमत सांगितल्याबद्दल किंवा परिमाण दर्शविल्याबद्दल शास्ती. १३

२९. वजने, मापे वगैरे लबाडीने वापरल्याबद्दल शास्ती ... १३

३०. खोटे वजन किंवा माप वगैरे कब्जात ठेवण्याबद्दल शास्ती ... १३

३१. खोटी वजने किंवा मापे, वगैरे बनविण्याबद्दल किंवा विकण्याबद्दल शास्ती ... १३

३२. करारात वजनाने किंवा मापाने ठरविलेल्या परिमाणाहून कमी किंवा त्यापेक्षा अधिक प्रमाणात कोणतीही वस्तू स्वाधीन केल्यास किंवा घेतल्यास त्याबद्दल शास्ती. १४

३३. खोटी वजने, मापे, इत्यादी बनविण्याबद्दल शास्ती ... १४

३४. तपासणीसाठी वजन किंवा मापे, वगैरे हजर करण्यात हयगय करण्याबद्दल किंवा हजर करण्याचे नाकारण्याबद्दल शास्ती. १५

३५. निरीक्षकाने कर्तव्य भंग केल्याबद्दल शास्ती ... १५

३६. सरकारजमा करणे ... १५

## अनुक्रमणिका--चालू

### प्रकरण पाच

कलमे


| | | |
|---|---|---|
| ३७. | नियंत्रक, वगैरे लोक-सेवक असणे ... | १५ |
| ३८. | सद्भावनापूर्वक केलेल्या उपाययोजनेस संरक्षण ... | १५ |
| ३८-क. | अपराधांची तडजोड करणे ... | १६ |
| ३९. | अपराधांची दखल घेणे, वगैरे ... | १६ |
| ४०. | शिक्का वठविलेले वजन, वगैरे बिनचूक आहे असे गृहित धरणे ... | १६ |
| ४१. | कंपन्यांनी केलेले अपराध ... | १६ |
| ४२. | अधिकार सोपविणे ... | १७ |
| ४३. | वजनात किंवा मापात क्षम्य समजता येईल अशा चुकांची मर्यादा ... | १७ |
| ४४. | सन १९३२ चा मुंबई अधिनियम १५ किंवा तत्सम कायदे लागू असल्याचे बंद होणे. | १७ |
| ४५. | सन १९५६ चा अधिनियम, ८९ याच्या कलम १४ अन्वये ज्या मुदतीपर्यंत इतर वजने व मापे वापरण्याची परवानगी देण्यात आली असेल त्या मुदतीत विशेष तरतुदी. | १८ |
| ४६. | नियम करण्याचा अधिकार ... | १८ |
| ४६-क. | संघराज्याच्या सशस्त्र दलाच्या संस्थेत किंवा युनिटात वापरण्यांत येत असलेल्या वजनांच्या व मापांच्या बाबतीत अधिनियम लागू नसणे. | २१ |
| ४७. | सन १९५८ चा मुंबई अध्यादेश २ रद्द करणे व व्यावृत्ती ... | २१ |




S(H)-733a

# *[ मुंबई वजने व मापे (अंमलबजावणी) अधिनियम, १९५८ ]

[ २७ सप्टेंबर, १९५८ ]

[ सन १९५८ चा मुंबई अधिनियम ६९ ][1]

[ राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रात" दिनांक २७ सप्टेंबर १९५८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश याअन्वये अनुकूलन, फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या :--

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

## मुंबई राज्यात प्रमाणभूत वजने व मापे अंमलात आणण्याकरिता व तत्संबंधित बाबींकरिता तरतूद करण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** मुंबई राज्यात प्रमाणभूत वजने व मापे अंमलात आणण्याची व तत्संबंधित बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

### प्रकरण एक

### प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास मुंबई वजने व मापे (अंमलबजावणी) अधिनियम, १९५८ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो संपूर्ण [2][ महाराष्ट्र राज्यास ] लागू आहे.

(३) तो, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा दिनांकास अंमलात येईल; आणि या अधिनियमाच्या निरनिराळ्या तरतुदींखाली किंवा, निरनिराळ्या क्षेत्रांसाठी, किंवा उपक्रमांच्या निरनिराळ्या वर्गांसाठी, किंवा मालाच्या निरनिराळ्या वर्गांसाठी निरनिराळे दिनांक नेमता येतील.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई सरकारचे राजपत्र, भाग पाच, पृष्ठे ५६९-५७० (इंग्रजी) पहा.

२. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे "मुंबई राज्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* मुंबई वजने व मापे (अंमलबजावणी) अधिनियम, १९८५ च्या तरतुदी (सन १९८५ चा अधिनियम क्रमांक ५४) संपूर्ण महाराष्ट्र राज्यास, १ जुलै, १९८७ लागू करण्यात आल्या. पहा शासकीय अधिसूचना, अन्न व नागरी पुरवठा क्रमांक डब्ल्यूएमए-१०८६/८९९/२५१६/तीस, दिनांक २९ जून १९८७ आणि अशी अंमलबजावणी केल्यावर या अधिनियमाच्या तत्सम तरतुदी, उक्त केंद्रीय अधिनियमाच्या कलम ७५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे निरसित होतात.

व्याख्या. २. संदर्भावरून अन्यथा आवश्यक नसेल तर, या अधिनियमात,--

(क) "व्यापारविषयक वजन किंवा माप" याचा अर्थ, कोणत्याही व्यापारविषयक किंवा वाणिज्यविषयक व्यवहारात वापरलेले प्रमाणभूत वजन किंवा माप असल्याचे अभिप्रेत असलेले वजन किंवा माप, असा आहे ;

(ख) "नियंत्रक" याचा अर्थ, कलम १५ अन्वये नेमलेला, वजने व मापे यांचा नियंत्रक, असा आहे ;

(ग) "निरीक्षक" याचा अर्थ, कलम १५ अन्वये नेमलेला वजने व मापे यांचा निरीक्षक, असा आहे ;

(घ) "मापण्याचे साधन" याचा अर्थ, वजन करण्याच्या साधनाव्यतिरिक्त कोणतेही मापण्याचे साधन, असा आहे ; आणि त्यात लांबी, क्षेत्र, आकारमान व समावेश-शक्ती मापण्याच्या कोणत्याही साधनाचा समावेश होतो ;

(ङ) "टांकसाळ" याचा अर्थ, मुंबईतील किंवा कलकत्त्यातील केंद्र सरकारची टांकसाळ, असा आहे ;

(च) "विहित केलेला" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमान्वये विहित केलेला, असा आहे ;

(छ) "नमुनेवजा प्रमाणे" याचा अर्थ, प्रमाणभूत वजने व मापे अधिनियम, १९५६ याचे कलम १५, पोट-कलम (२) यानुसार केंद्र सरकारने राज्य शासनाला पुरविलेले प्रमाणभूत वजने व मापे यांचे संच, असा आहे ;

[१][ (छछ) "सीलबंद पॅकेज किंवा डबा" याचा अर्थ, एखादा पदार्थ ज्यात ठेवलेला किंवा नीट बांधलेला असेल व ज्याचा उद्देश विक्रीच्या वेळी मोजमाप न करता त्यात असलेल्या वस्तूंची विक्री करण्याचा असेल असे पाकीट, बाटली, करंडा, डबा, पिंप, वेष्टन, बारदाना, पिशवी, पोते, आवरण किंवा इतर कोणतीही वस्तू, असा आहे ; ]

(ज) "प्रमाणभूत वजन किंवा माप" याचा अर्थ, वजने व मापे यांच्या प्रमाणाबाबत अधिनियम, १९५६ याचे कलम १३, पोट-कलम (१) यात उल्लेख केलेला वस्तुमानाचा (mass) किंवा मापाचा कोणताही घटक, असा आहे ; १९५६ चा ८९.

(झ) "शिक्का वठविणे" याचा अर्थ, शक्य तेथवर पुसल्या जाणार नाहीत अशा रीतीने खुणा करणे असा आहे आणि त्याल ओतकामाने, खोदकामाने, आम्ललेखाने किंवा डाग देऊन खुणा करणे याचा समावेश होतो ;

[२][ (झझ) 'व्यापार किंवा वाणिज्य या संबंधीच्या कोणत्याही व्यवहारात वापर करणे' या शब्दप्रयोगाचा अर्थ,--

(क) विक्रीच्या, खरेदीच्या, विनियोगाच्या किंवा इतर प्रकारच्या स्वरूपात केलेल्या कोणत्याही कराराच्या संबंधात ; किंवा

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ च्या कलम २ (क) द्वारे हा खंड दाखल करण्यात आला.

२. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ च्या कलम २ (ख) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(ख) स्वामित्व रक्कम, दस्तुरी, शुल्क किंवा इतर येणे असलेल्या रकमा निर्धारित करण्याच्या संबंधात ; किंवा

(ग) शोध किंवा वैज्ञानिक अभ्यासासाठी किंवा घरगुती प्रयोजनासाठी एखाद्या व्यक्तीच्या घरगुती उपयोगाकरिता केलेल्या सेवेव्यतिरिक्त केलेले इतर कोणतेही काम किंवा सेवा ठरविण्याच्या संबंधात,

एखाद्या वस्तूचे लांबी, क्षेत्रफळ, घनता, समावेश-शक्ती, किंवा वजनाच्या रूपात परिमाण जाहिर करण्यासाठी किंवा ठरविण्यासाठी तिचा वापर करणे, असा आहे ;]।

(ञ) "बरोबर आहे किंवा नाही हे पडताळून पाहणे" हा शब्दप्रयोग जेव्हा वजन किंवा माप अगर वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन यास अनुलक्षून वापरण्यात येईल तेव्हा, त्यात व्याकरणदृष्ट्या होणारे फेरफार धरून असे वजन किंवा माप अगर वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन ताडून पाहण्याच्या, तपासण्याच्या किंवा पडताळून पाहण्याच्या क्रियेचा समावेश होतो ; आणिं त्या संज्ञेत बरोबर आहे किंवा नाही हे पुन्हा पडताळून पाहणे याचाही समावेश होतो ;

(ट) "वजन करण्याचे साधन" याचा अर्थ, वजन करण्याचे कोणतेही साधन, असा आहे आणि त्यात तराजू, त्याच्या वजनासह, तराजूच्या दांड्या (स्केलबीम्स), काटा (बॅलन्स), ताणकाटा (स्प्रिंग बॅलन्स), दंडतुला (स्टील यार्ड) आणि वजन करण्याची इतर यंत्रे यांचा समावेश होतो.

## प्रकरण दोन

## प्रमाणभूत वजने व मापे

**३.** (१) व्यापार किंवा वाणिज्य यासंबंधीच्या व्यवहारात वापरलेली व्यापारविषयक वजने व मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहण्याच्या कारणासाठी राज्य शासनास, चालू प्रमाणे म्हणून संबोधावयाच्या अभिप्रमाणित केलेल्या प्रमाणभूत वजनांचे व मापांचे जितके संच त्यास आवश्यक वाटतील तितके संच तयार करवून घेण्याचा अधिकार आहे. चालू प्रमाणे.

[१]* * *

(२) चालू प्रमाणे ही विहित करण्यात येईल अशा पदार्थांची आणि नमुन्यांची व वर्णनांची असली पाहिजेत आणि ती विहित करण्यात येईल अशा कारखान्याकडून (एजन्सीकडून) तयार करून घेतली पाहिजेत आणि त्यांवर विहित करण्यात येईल अशा व्यक्तीकडून किंवा प्राधिकाऱ्याकडून व विहित करण्यात येईल अशा रीतीने शिक्का वठविला पाहिजे व ती अभिप्रमाणित करण्यात आली पाहिजेत.

(३) चालू प्रमाणे ही, विहित करण्यात येईल अशा ठिकाणी, अशा अभिरक्षेत व अशा रीतीने ठेवली पाहिजेत.

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ च्या कलम ३ (ख) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

(४) चालू प्रमाणे ही, विहित करण्यात येईल अशा व्यक्तीकडून अशा ठिकाणी अशा मुदती मुदतीने व अशा रीतीने दुय्यम प्रमाणांच्या बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहिले पाहिजे व त्यावर निशाणी केली पाहिजे ;

[१]* * *

(५) विहित केलेल्या मुदतीत अशा रीतीने पडताळून न पाहिलेले व निशाणी न केलेले चालू प्रमाण वैध आहे असे समजण्यात येणार नाही किंवा ते या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता वापरता कामा नये.

(६) जे चालू प्रमाण सदोष झाले असेल ते, बरोबर आहे किंवा नाही हे विहित केलेल्या रीतीने पडताळून पाहिलेले असल्याखेरीज व त्यावर निशाणी केली असल्याखेरीज वैध आहे असे समजण्यात येणार नाही किंवा ते या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता वापरता कामा नये.

दुय्यम प्रमाणे.

**४.** (१) चालू प्रमाणे बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहण्याच्या कारणासाठी राज्य शासनास, दुय्यम प्रमाणे म्हणून संबोधावयाच्या अभिप्रमाणित केलेल्या प्रमाणभूत वजनांचे व मापांचे जितके संच त्यास आवश्यक वाटतील तितके संच टांकसाळीत तयार करवून घेण्याचा अधिकार आहे.

(२) दुय्यम प्रमाणे ही, विहित करण्यात येईल अशा पदार्थाची आणि नमुन्यांची व वर्णनांची असली पाहिजेत आणि त्यावर केंद्र सरकार निदेश देईल अशा व्यक्तीने किंवा प्राधिकाऱ्याने शिक्का वठविला पाहिजे व ती अभिप्रमाणित केली पाहिजेत.

(३) दुय्यम प्रमाणे ही, विहित करण्यात येईल अशा ठिकाणी, अशा अभिरक्षेत व अशा रीतीने ठेवली पाहिजेत.

(४) दुय्यम प्रमाण हे, विहित केलेल्या रीतीने, दर पाच वर्षांच्या मुदतीत निदान एकदा तरी, राज्य शासन निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा प्राधिकाऱ्याकडून, नमुनावजा प्रमाणाच्या बरोबर आहे किंवा नाही हे पडताळून पाहिले पाहिजे व त्यावर पडताळून पाहिल्याच्या दिनांकाची निशाणी केली पाहिजे.

(५) उपरोक्त मुदतीत अशा रीतीने पडताळून न पाहिलेले व निशाणी न केलेले दुय्यम प्रमाण हे वैध आहे असे समजण्यात येणार नाही आणि ते या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता वापरता कामा नये.

नमुनेवजा प्रमाणे.

**५.** नमुनेवजा प्रमाणे ही, राज्य शासन निदेश देईल अशा ठिकाणी, अशा अभिरक्षेत व अशा रीतीने ठेवली पाहिजेत.

वजन करण्याची व मापण्याची प्रमाणभूत साधने.

**६.** (१) व्यापार किंवा वाणिज्य या संबंधीच्या व्यवहारांत वापरलेली व्यापारविषयक वजने व मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहण्याच्या कारणाकरिता राज्य शासनास, वजन करण्याच्या व मापण्याच्या साधनांचे जितके संच आवश्यक वाटतील तितके संच तयार करवून घेण्याचा अधिकार आहे.

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ च्या कलम ३ (ख) द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

(२) अशी साधने, विहित करण्यात येईल अशा प्रकारची असली पाहिजेत, विहित करण्यात येईल किमान एकदा नियतकालिक आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने ती बरोबर आहेत की नाहीत हे पडताळून पाहिले पाहिजे व त्यावर शिक्का वठविला पाहिजे.

(३) अशी साधने, जेथे दुय्यम प्रमाणे किंवा चालू प्रमाणे ठेवण्यात येतात त्या सर्व ठिकाणी ठेवली पाहिजेत.

**७.** [१][(१) इतर कोणताही विधि किंवा कोणतीही रूढी, वहिवाट किंवा प्रघात यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत हे कलम अंमलात आले असेल त्या क्षेत्रातील व्यापार किंवा वाणिज्य यासंबंधीच्या कोणत्याही व्यवहारात किंवा ज्या मालाच्या किंवा उपक्रमांच्या वर्गाच्या बाबतीत हे कलम अंमलात आले असेल त्या मालाच्या किंवा उपक्रमांच्या वर्गाच्या संबंधात, प्रमाणभूत वजने व मापे याव्यतिरिक्त इतर कोणत्याही वस्तुमानाचा किंवा मापाच्या घटकाचा वापर करता कामा नये किंवा असा व्यवहार सर्वसाधारणपणे ज्या जागेत चालविण्यात येत असेल त्या जागेत असा घटक ठेवता कामा नये.] प्रमाणभूत वजने व मापे यांव्यतिरिक्त इतर वजने व मापे वापरण्यास मनाई.

(२) कोणत्याही व्यापारात ज्या वजनाने किंवा मापाने एखाद्या पदार्थासंबंधी करार किंवा व्यवहार करण्यात आला असेल त्या वजनाने किंवा मापाने ठरविलेल्या परिमाणापेक्षा त्या पदार्थाचे कोणतेही अधिक किंवा कमी परिमाण मागण्याची किंवा स्वीकारण्याची किंवा त्याची मागणी किंवा स्वीकार करावयास लावण्याची व्यापाऱ्यास, विक्रेत्यास किंवा खरेदी करणाऱ्यास परवानगी देणारी कोणत्याही प्रकारची रूढी, वहिवाट, प्रघात किंवा पद्धत ही निरर्थक आहे, असे समजावे.

(३) या कलमाच्या प्रारंभानंतर तीन महिने संपल्यानंतर केलेला किंवा झालेला कोणताही व्यवहार, देवघेव किंवा करार, जेथवर त्यामुळे पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन होईल तेथवर, निरर्थक असेल.

**८.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे कोणत्याही विशिष्ट धंद्यात किंवा धंद्याच्या वर्गात केवळ वजनाने असेल किंवा केवळ मापाने असेल ते खेरीज करून कोणताही व्यवहार देवघेव किंवा करार करता किंवा होता कामा नये असा निदेश देण्याचा अधिकार आहे. विवक्षित बाबतीत केवळ वजने किंवा केवळ मापे वापरण्यास सांगण्याचा अधिकार.

(२) या कलमान्वये काढलेली अधिसूचना तीत निर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रदेशात, अशा दिनांकापासून व अशा कोणत्याही शर्ती, असल्यास, त्यास अधीन राहून अंमलात येईल.

## प्रकरण तीन

## वजने व मापे बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहणे व त्यावर शिक्का वठविणे

**९.** व्यापारविषयक वजन किंवा माप म्हणून वापरण्यासाठी बनविलेले प्रत्येक वजन किंवा माप यावर, जे वजन किंवा माप म्हणून ते असेल त्या वजनाच्या किंवा मापाच्या संज्ञेची निशाणी विहित करण्यात येईल अशा रीतीने स्पष्टपणे केलेली असली पाहिजे. व्यापार विषयक वजने व मापे यांवर संज्ञांची निशाणी करणे.

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ च्या कलम ४ द्वारे हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

शिक्का न वठविलेली वजने किंवा मापे यांच्या विक्रीस मनाई.

**१०.** कोणतेही व्यापारविषयक वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन हे, या अधिनियमान्वये केलेल्या नियमानुसार बरोबर आहे किंवा नाही हे पडताळून किंवा पुन्हा पडताळून पाहिलेले असल्याशिवाय व त्यावर निरीक्षकाने विहित केलेल्या रीतीने शिक्का वठविलेला असल्याशिवाय विकता किंवा स्वाधीन करता कामा नये.

शिक्का न वठविलेली व्यापार विषयक वजने किंवा मापे वापरण्यास मनाई.

**११.** कोणतेही वजन किंवा माप अथवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन हे, निरीक्षकाने या अधिनियमान्वये केलेल्या नियमांप्रमाणे बरोबर आहे किंवा नाही हे पडताळून किंवा पुन्हा पडताळून पाहिलेले असल्याशिवाय व तसेच त्यावर त्याने बरोबर असल्याविषयी विहित केलेल्या रीतीने शिक्का वठविलेला असल्याशिवाय ते कोणत्याही व्यापारविषयक किंवा वाणिज्यविषयक व्यवहारात वापरता कामा नये.

माफी देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**१२.** जेव्हा व्यापरविषयक वजनाच्या किंवा मापाच्या लहान आकारामुळे त्यावर कलम ९ च्या तरतुदींअन्वये कोणत्याही संज्ञेची निशाणी करणे किंवा कलम १० च्या किंवा कलम ११ च्या तरतुदींन्वये शिक्का वठविणे अशक्य असेल तेव्हा, राज्य शासनास राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून असे वजन किंवा माप त्यावर अशा रीतीने निशाणी करण्यापासून किंवा शिक्का वठविण्यापासून माफ करण्याचा अधिकार आहे.

लायसन शिवाय वजने व माप तयार करणे वगैरेस मनाई.

**१३.** कोणत्याही व्यक्तीने, व्यापाराच्या ओघात, विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, राज्य शासनाला किंवा या बाबतीत त्याने अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला देता येईल असे, व्यापारविषयक वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन तयार करण्याच्या, दुरुस्त करण्याच्या किंवा विकण्याच्या बाबतीतील लायसन विहित केलेल्या रीतीने मिळविलेले असल्याखेरीज कोणतेही व्यापारविषयक वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे कोणतेही साधन तयार करता, दुरुस्त करता किंवा विकता कामा नये.

सीलबंद डबे, वगैरेतील वस्तूंचे वजन किंवा माप लिहिणे.

**१४.** कोणत्याही व्यक्तीने सीलबंद पॅकेजमधील किंवा डबे, वगैरेमधील कोणतीही वस्तू, अशा पॅकेजवर किंवा डबे, वगैरेवर किंवा त्याला घट्ट चिकटविलेल्या लेबलवर त्यात असलेल्या वस्तूच्या निव्वळ वजनाचे किंवा मापाचे वर्णन असल्याखेरीज, विकता, विक्रीसाठी देऊ करता, विक्रीसाठी मांडता किंवा विक्रीसाठी कब्ज्यात ठेवता कामा नये :

[१][ परंतु, या कलमाच्या तरतुदी पुढील बाबतीत, म्हणजे,--

(क) (एक) ज्या सीलबंद पाकिटात किंवा डब्यात बिस्किटे, मिष्टान्न किंवा मेवामिठाई असेल आणि ज्याचे ठोक वजन एकशेवीस ग्रॅमपेक्षा कमी नसेल ; आणि

(दोन) ज्या सीलबंद पाकिटात किंवा डब्यात इतर अन्नपदार्थ असतील आणि ज्याचे ठोक वजन साठ ग्रॅमपेक्षा कमी नसेल अशा सीलबंद पाकिटाच्या व डब्याच्या बाबतीत ;

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम ५ द्वारे हे परंतुक दाखल करण्यात आले.

(ख) जी वस्तू व्यापारविषयक किंवा वाणिज्यविषयक व्यवहारात सामान्यपणे वजन करून किंवा मापून विकण्यात येत नाही अशा विकलेल्या, विक्रीकरता देऊ केलेल्या किंवा विक्रीसाठी मांडलेल्या किंवा विक्रीसाठी ताब्यात ठेवलेल्या वस्तूंच्या बाबतीत,

लागू होणार नाही :

तसेच, अशा कोणत्याही प्रकारच्या पाकिटाच्या किंवा डब्याच्या आकारामुळे या कलमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करणे अव्यवहार्य आहे अशी राज्य शासनाची खात्री होईल, तर राज्य शासनाला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा वर्गाची पाकिटे किंवा डबे या कलमाच्या अंमलबजावणीच्या कक्षेतून वगळण्याचा अधिकार राहील. ]

प्रमाणभूत वजने व मापे याखेरीज करून इतर कोणत्याही स्वरूपात कोणत्याही वस्तूची किंमत सांगण्यास किंवा परिमाण दर्शविण्यास मनाई.

[1][ १४-क. कोणत्याही व्यक्तीने व्यापार किंवा वाणिज्य यासंबंधीच्या कोणत्याही व्यवहारात, प्रमाणभूत वजने व मापे याखेरीज करून इतर कोणत्याही स्वरूपात कोणत्याही वस्तूची किंमत सांगता कामा नये किंवा तिचे परिमाण दर्शविता कामा नये.]

नियंत्रक, उपनियंत्रक, सहायक नियंत्रक व निरीक्षक यांची नेमणूक.

१५. (१) राज्य शासनाला, या अधिनियमाद्वारे किंवा तद्अन्वये त्यांना दिलेले अधिकार वापरण्यासाठी किंवा त्याजवर सोपवलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी, राज्याकरिता एका वजने व मापे यांच्या नियंत्रकाची, आणि आवश्यक असतील इतक्या वजने व मापे यांच्या उप-नियंत्रकांची, सहायक नियंत्रकांची व निरीक्षकांची नेमणूक करण्याचा अधिकार आहे. त्यांच्या पात्रता विहित करण्यात येतील अशा असतील.

(२) राज्य शासनाला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, ज्या स्थानिक हद्दींच्या आत प्रत्येक निरीक्षकाने, या अधिनियमाद्वारे किंवा तद्अन्वये निरीक्षकांना दिलेले अधिकार वापरले पाहिजेत व त्याजकडे सोपवलेली कर्तव्ये पार पाडली पाहिजेत त्या स्थानिक हद्दी ठरविण्याचा अधिकार आहे.

(३) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, वजने व मापे यांच्या सर्व उप व सहायक नियंत्रकांनी व निरीक्षकांनी, नियंत्रकाच्या सर्वसाधारण देखरेखीखाली व नियंत्रणाखाली त्यांची कामे केली पाहिजेत ; आणि वजने व मापे यांच्या नियंत्रकास, उप-नियंत्रकास व सहायक नियंत्रकास, या अधिनियमाद्वारे किंवा तद्अन्वये त्यांना दिलेल्या अधिकारांव्यतिरिक्त व त्यांचेकडे सोपवलेल्या कर्तव्यांव्यतिरिक्त, निरीक्षकांना अशा रीतीने दिलेला आणखी कोणताही अधिकार वापरण्याचा आणि निरीक्षकांवर अशा रीतीने सोपवलेले आणखी कोणतेही कर्तव्य पार पाडण्याचा अधिकार आहे.

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ६ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

**निरीक्षकांकडून पडताळणी आणि शिक्का वठविणे.**

**१६.** (१) प्रत्येक निरीक्षकाने, वजने व मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने बरोबर आहेत की नाहीत हे पडताळून पाहण्याच्या प्रयोजनाकरिता, नियंत्रक याबाबत नेमून देईल अशा वेळी व त्याच्या अधिकारक्षेत्रातील नेमून देईल अशा ठिकाणी हजर राहिले पाहिजे.

(२) जे वजन किंवा माप, किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन बरोबर आहे किंवा नाही हे पडताळून पाहण्याच्या कारणासाठी निरीक्षकाकडे आणण्यात येईल ते प्रत्येक वजन किंवा माप, किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन बरोबर आहे किंवा नाही हे त्याने पडताळून पाहिले पाहिजे आणि असे वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन बरोबर व वजने व मापे यांच्या प्रमाणांबाबत अधिनियम, १९५६ यास व तद्अन्वये केलेल्या नियमास अनुसरून असल्याचे त्यास आढळून आल्यास, त्याने ते बरोबर असल्याविषयीचा शिक्का त्यावर विहित केलेल्या रीतीने वठविला पाहिजे. १९५६ चा ८९.

[1][(३) कलम १५, पोट-कलम (३) यात काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या जिल्हा परिषदेच्या हद्दीत किंवा अशा हद्दीच्या कोणत्याही भागात या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये अधिकार वापरणाऱ्या व कामे पार पाडणाऱ्या निरीक्षकाने, याबाबतीत राज्य शासन नियुक्त करील अशा जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली असे अधिकार वापरले पाहिजेत आणि अशी कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजेत.]

**तपासणे वगैरेचा अधिकार.**

**१७.** (१) निरीक्षकास, त्याच्या अधिकाराखाली असलेल्या क्षेत्रात व्यापारविषयक किंवा वाणिज्यविषयक व्यवहारात वापरण्यात येणारी, किंवा कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात असलेली किंवा अशा वापरासाठी कोणत्याही जागेत असलेली वजने, मापे व वजन करण्याची व मापण्याची साधने सर्व वाजवी वेळी तपासण्याचा अधिकार आहे, आणि त्यास असे प्रत्येक वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन, पडताळून पाहण्याच्या कारणासाठी विहित केलेल्या दुय्यम किंवा चालू प्रमाणाबरोबर किंवा वजन करण्याच्या किंवा मापण्याच्या साधनाबरोबर आहे किंवा नाही हे पडताळून पाहण्याचा अधिकार आहे.

(२) कोणत्याही व्यवहारात वापरलेले कोणतेही वजन किंवा माप बरोबर आहे किंवा नाही हे पडताळून पाहण्याच्या कारणाकरिता, व्यवहाराच्या ओघात विकलेल्या किंवा स्वाधीन केलेल्या कोणत्याही वस्तूचे वजन किंवा माप बरोबर आहे किंवा नाही हे पडताळून पाहण्याचाही निरीक्षकास अधिकार आहे.

(३) निरीक्षकास, सर्व वाजवी वेळी, कोणत्याही व्यापाऱ्यास किंवा व्यापाऱ्याच्या कोणत्याही सेवकास किंवा अभिकर्त्यास, तो वापरीत असलेली किंवा त्याच्या कब्जात असलेली किंवा व्यापाराकरिता वापरलेल्या कोणत्याही जागेत ठेवलेली सर्व वजने, मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने आणि त्यासंबंधीची सर्व कागदपत्रे व अभिलेख तपासणीसाठी आपल्यापुढे हजर करण्याविषयी फर्माविण्याचा अधिकार आहे, आणि अशा व्यापाऱ्याने, सेवकाने किंवा अभिकर्त्याने अशा रीतीने फर्माविण्यात आलेल्या गोष्टींचे पालन केले पाहिजे.

---

१. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २८६. दहावी अनुसूची याद्वारे पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

(४) ज्याच्या संबंधात या अधिनियमाखालील एखादा अपराध केल्याचे दिसून येईल किंवा असा अपराध करण्यासाठी जे वापरण्यात आले आहे किंवा वापरले जाण्याचा संभव आहे असे दिसून येईल असे कोणतेही वजन किंवा माप अगर वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन ताब्यात घेण्याचा व अटकावून ठेवण्याचा निरीक्षकास अधिकार आहे, तसेच, त्यास अशा वजनाच्या किंवा मापाच्या किंवा वजन करण्याच्या किंवा मापण्याच्या साधनाच्या साहाय्याने विकलेल्या किंवा स्वाधीन केलेल्या अथवा विकावयास किंवा स्वाधीन करावयास लावलेल्या कोणत्याही वस्तू, त्यासंबंधीची कोणतीही क़ागदपत्रे किंवा दप्तरे यांसह ताब्यात घेण्याचा व अटकावून ठेवण्याचाही अधिकार आहे.

९५६ चा ९.

(५) जेव्हा एखाद्या सीलबंद पॅकेजमध्ये किंवा डब्यात, वगैरे जितक्या निव्वळ वजनाची किंवा मापाची वस्तू असल्याचे अभिप्रेत असेल तितक्या निव्वळ वजनाची किंवा मापाची वस्तू त्यात प्रत्यक्ष नसावी असे वाटण्यास निरीक्षकास कारण असेल तेव्हा निरीक्षकास, सीलबंद पॅकेज किंवा डबा, वगैरे उघडण्याचा व त्यातील वस्तू बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहण्याचा अधिकार आहे आणि जर, अशा रीतीने पडताळून पाहिल्यावर वस्तूंचे निव्वळ वजन किंवा माप बरोबर असल्याचे आढळून येईल तर, निरीक्षकाने ते पॅकेज किंवा डबा, वगैरे, त्यातील वस्तूंची हानी होऊ न देता पुन्हा सीलबंद करणे शक्य असेल त्याबाबतीत ते पुन्हा सीलबंद केले पाहिजे, आणि आतील वस्तूंचे बिनचूक वजन किंवा माप नमूद करणारे प्रमाणपत्र त्यास जोडले पाहिजे ; परंतु, जर, उलटपक्षी, वस्तूंचे निव्वळ वजन किंवा माप बरोबर नसल्याचे आढळून येईल तर, निरीक्षकास पॅकेज व डबा, वगैरे आणि त्यातील वस्तू ताब्यात घेण्याचा व अटकावून ठेवण्याचा अधिकार आहे.

(६) अशा तपासणीच्या कारणासाठी, जेथे वजने, मापे किंवा वजन करण्याची अगर मापण्याची साधने व्यापारविषयक किंवा वाणिज्यविषयक व्यवहारात वापरण्यात येतात किंवा वापरण्यासाठी ठेवण्यात येतात अशा जागेत सर्व वाजवीवेळी प्रवेश करण्याचा आणि अशी वजने व मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने तपासण्याचा निरीक्षकास अधिकार आहे.

वजने किंवा मापे नीट करण्याचा निरीक्षकाचा अधिकार.

**१८.** कोणत्याही क्षेत्रात वजने किंवा मापे किंवा वजन करण्याची किंवा मापण्याची साधने नीट करण्याची निरीक्षकास परवानगी देणे इष्ट आहे असे राज्य शासनास वाटेल त्या बाबतीत, अशा क्षेत्रात, राज्य शासनाला योग्य वाटेल तर, अशा निरीक्षकास त्याप्रमाणे अशी वजने, मापे किंवा साधने नीट करण्याचा अधिकार देण्याचा राज्य शासनास अधिकार आहे.

माल तयार करणारे, वगैरेंनी दप्तरे व कागदपत्रे ठेवणे.

**१९.** (१) वजने व मापे किंवा वजन करण्याची किंवा मापण्याची साधने तयार करणाऱ्या, दुरुस्त करणाऱ्या किंवा त्यांचा व्यापार करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने व व्यापार किंवा वाणिज्य यासंबंधीच्या व्यवहारात त्यांचा वापर करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने निरीक्षकाकडून दप्तर व हिशेब ठेवण्यास सांगण्यात आल्यास, विहित करण्यात येईल असे दप्तर व हिशोब ठेवले पाहिजेत, आणि असे दप्तर व हिशोब विहित करण्यात येईल अशा रीतीने त्यांच्यापुढे सादर केले पाहिजेत.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही असले तरी, अशा माल तयार करणाऱ्या, दुरुस्त करणाऱ्या किंवा त्याचा व्यापार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने चालविलेल्या धंद्याचे स्वरूप लक्षात घेता राज्य शासनाच्या मते तसे करणे आवश्यक असेल तर, त्यास, आदेशाद्वारे, अशा व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या वर्गास त्या पोट-कलमाच्या कक्षेतून वगळण्याचा अधिकार आहे.

अपीले.

**२०.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून,--

(क) या अधिनियमान्वये निरीक्षकाने किंवा सहायक नियंत्रकाने किंवा उप नियंत्रकाने दिलेल्या प्रत्येक निर्णयाविरुद्ध नियंत्रकाकडे ; आणि

(ख) खंड (क) अन्वयेच्या अपिलात दिलेला निर्णय नसणाऱ्या, या अधिनियमान्वये नियंत्रकाने दिलेल्या प्रत्येक निर्णयाविरुद्ध राज्य शासनाकडे किंवा राज्य शासनाने याबाबत विशेष अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे,

अपील करता येईल.

(२) असे प्रत्येक अपील, निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत केले पाहिजे.

(३) असे अपील मिळाल्यावर, अपील प्राधिकाऱ्याने, अपील करणारास त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी देऊन व त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर अपिलाचा निर्णय केला पाहिजे आणि अपील प्राधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल.

फी आकारणे.

**२१.** राज्य शासनास,--

(क) कलम १३ अन्वये लायसन देण्याबद्दल, व्यापारविषयक वजने व मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने तयार करण्याबद्दल, ती दुरुस्त करण्याबद्दल किंवा त्यांची विक्री करण्याबद्दल, आणि

(ख) व्यापारविषयक वजने व मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहाण्याबद्दल, त्यांवर निशाणी करण्याबद्दल, त्यांवर शिक्का वठविण्याबद्दल व ती नीट करण्याबद्दल,

विहित करण्यात येईल अशी फी आकारण्याचा अधिकार आहे.

योग्य रीतीने शिक्का वठविलेली वजने व मापे यांची वैधता.

**२२.** या अधिनियमान्वये निरीक्षकाने योग्य रीतीने शिक्का वठविलेले वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन, ते खोटे किंवा सदोष असल्याचे आढळून आले नाही तर, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदी ज्या ज्या ठिकाणी अंमलात आल्या आहेत त्या त्या सर्व ठिकाणी वैध वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन म्हणून समजले पाहिजे आणि त्यावर ज्या ठिकाणी प्रथमतः शिक्का वठविण्यात आला त्या ठिकाणाखेरीज इतर कोणत्याही ठिकाणी ते वापरण्यात आले याच केवळ कारणावरून त्यावर पुन्हा शिक्का वठविला जाण्यास ते पात्र असणार नाही.

## प्रकरण चार

### शास्ती

२३. जो कोणी, या कलमाच्या प्रारंभापासून तीन महिने संपल्यानंतर, व्यापार किंवा वाणिज्य यासंबंधीच्या कोणत्याही व्यवहारात प्रमाणभूत वजने किंवा मापे यांच्या संज्ञांपैकी कोणतीही संज्ञा नसलेल्या वजनाने किंवा मापाने कोणतीही वस्तू विकील किंवा विकण्यास लावील, किंवा स्वाधीन करील किंवा स्वाधीन करावयास लावील [1][ किंवा जी कोणतीही व्यक्ती ज्या जागेत सर्वसामान्यपणे असा व्यवहार करण्यात येत असेल त्या कोणत्याही जागेत प्रमाणभूत वजने व मापे याखेरीज करून कोणत्याही वस्तुमानाचा किंवा मापाचा घटक ठेवील,] त्यास, पहिल्या अपराधाबद्दल दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा हाईल किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

प्रमाणभूत वजन किंवा माप याव्यतिरिक्त [2][ इतर वजनाने किंवा मापाने विकण्याबद्दल किंवा स्वाधीन करण्याबद्दल किंवा कोणत्याही वस्तूमानाचा किंवा मापाचा घटक ठेवल्याबद्दल] शास्ती.

२४. जो कोणी या अधिनियमाच्या किंवा त्यान्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार बरोबर आहे किंवा नाही हे पडताळून किंवा पुन्हा पडताळून न पाहिलेले किंवा शिक्का न वठविलेले कोणतेही व्यापरविषयक वजन किंवा माप किंवा कोणतेही वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन विकील किंवा स्वाधीन करील त्यास, दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

शिक्का न वठविलेली व्यापार विषयक वजने व मापे विकण्याबद्दल शास्ती.

२५. जो कोणी, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार अधिकृत न केलेले किंवा पडताळून किंवा पुन्हा पडताळून न पाहिलेले किंवा शिक्का न वठविलेले कोणतेही व्यापारविषयक वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन, व्यापार किंवा वाणिज्य यासंबंधीच्या कोणत्याही व्यवहारात वापरील किंवा अशा रीतीने वापरण्यासाठी आपल्या कब्जात ठेवील त्यास, पहिल्या अपराधाबद्दल दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

शिक्का न वठविलेली व्यापार विषयक वजने व मापे वापरण्याबद्दल किंवा कब्जात ठेवण्याबद्दल शास्ती.

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ७ (क) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ७ (ख) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

**स्पष्टीकरण १.**--जेव्हा कोणतेही असे वजन किंवा माप अगर वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन कोणत्याही व्यापाऱ्याच्या किंवा अशा व्यापाऱ्याच्या कोणत्याही सेवकाच्या किंवा अभिकर्त्याच्या कब्जात असल्याचे आढळून येईल तेव्हा, विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत ते अशा व्यापाऱ्याने, सेवकाने किंवा अभिकर्त्याने व्यापार किंवा वाणिज्य यासंबंधीच्या व्यवहारात आपल्या कब्जात ठेवले होते असे गृहित धरण्यात येईल.

**स्पष्टीकरण २.**--या कलमाचे उल्लंघन करून व्यापाऱ्याच्या कोणत्याही सेवकाने किंवा अभिकर्त्याने अशा व्यापाऱ्याच्या वतीने कोणतेही वजन किंवा माप अगर वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन वापरले असेल किंवा आपल्या कब्जात ठेवले असेल तर, या कलमाखालील अपराध आपल्या सेवकाने किंवा अभिकर्त्याने आपल्या नकळत किंवा आपल्या संमतीशिवाय केला असे अशा व्यापाऱ्याने सिद्ध केले नाही तर, तो देखील असा अपराध केल्याबद्दल दोषी आहे, असे समजले पाहिजे.

कलम ८ चे उल्लंघन करून वजन किंवा माप वापरल्याबद्दल शास्ती.

**२६.** जो कोणी, कलम ८ अन्वये काढलेल्या अधिसूचनेच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील त्यास, दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

लायसन वाचून वजन, वगैरे तयार करण्याबद्दल दुरुस्त करण्याबद्दल किंवा विकण्याबद्दल शास्ती.

**२७.** जर कोणतीही व्यक्ती, कलम १३ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणेचे लायसन मिळविल्यावाचून कोणतेही व्यापारविषयक वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन तयार करील, दुरुस्त करील किंवा विकील त्यास, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा होईल किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

सीलबंद डब्यांवर, वगैरे वजन किंवा माप लिहिण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

**२८.** जो कोणी, कलम १४ च्या तरतुदींचे उल्लंघन करील त्यास, दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

[१] [२८-क. जो कोणी, कलम १४-क च्या तरतुदींचे उल्लंघन करील त्यास दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा हाईल. ] कलम १४ क चे उल्लंघन करून प्रमाणभूत वजन व मापे याखेरीज करून इतर कोणत्याही स्वरूपात किंमत सांगितल्याबद्दल किंवा परिमाण दर्शविल्याबद्दल शास्ती.

२९. जो कोणी, त्यास, खोटे आहे असे माहीत असूनही असे कोणतेही वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन लबाडीने वापरील त्यास, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा हाईल किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. वजने, मापे वगैरे लबाडीने वापरल्याबद्दल शास्ती.

३०. जो कोणी, त्यास, खोटे आहे असे माहीत असूनही असे कोणतेही वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन त्याचा लबाडीने वापर करण्याच्या हेतूने कब्जात ठेवील त्यास, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा होईल किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. खोटे वजन किंवा माप, वगैरे कब्जात ठेवण्याबद्दल शास्ती.

३१. जो कोणी, खोटे आहे हे त्याला माहीत असून ते खरे म्हणून वापरण्यात यावे म्हणून, किंवा ते खरे म्हणून वापरण्यात येण्याचा संभव असल्याचे माहीत असून कोणतेही वजन किंवा माप अगर वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन बनवील, विकील किंवा त्याची विल्हेवाट लावील किंवा बनविण्याची, विकण्याची किंवा त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करील त्यास, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. खोटी वजने किंवा मापे, वगैरे बनविण्या-बद्दल किंवा विकण्याबद्दल शास्ती.

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ८ द्वारे कलम २८ क समाविष्ट करण्यात आले.

| | |
|---|---|
| करारात वजनाने किंवा मापाने ठरविलेल्या परिमाणाहून कमी किंवा त्यापेक्षा अधिक परिमाणात कोणतीही वस्तू स्वाधीन केल्यास किंवा घेतल्यास त्याबद्दल शास्ती. | [1] [ **३२.** जो कोणी,--<br><br>(१) एखाद्या वस्तूसंबंधी केलेल्या करारात किंवा व्यवहारात वजनाने किंवा मापाने जे परिमाण निश्चित केले असेल त्याहून [illegible] वस्तू [illegible] करताना किंवा खरेदीदारास विकील किंवा त्याच्या स्वाधीन करील किंवा विकण्याची किंवा स्वाधीन करण्याची व्यवस्था करील ; किंवा<br><br>(२) वजनाने किंवा मापाने कोणतीही वस्तू विकत घेण्याचे अभिप्रेत असताना, एखाद्या वस्तूसंबंधी केलेल्या करारात किंवा व्यवहारात वजनाने किंवा मापाने जे परिमाण निश्चित केले असेल त्याहून जास्त परिमाणात विक्रेत्याकडून अशा वस्तूंची मागणी करील किंवा घेईल किंवा मागणी करण्याची किंवा घेण्याची व्यवस्था करील तर, त्यास पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.] |
| खोटी वजने, मापे इत्यादी बनविण्या-बद्दल शास्ती. | **३३.** (१) जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये कोणत्याही प्रमाणभूत वजनावर किंवा मापावर अगर वजन करण्याच्या किंवा मापण्याच्या साधनावर शिक्का वठविण्यासाठी वापरलेल्या कोणत्याही शिक्क्यासारखा खोटा शिक्का वठविल किंवा त्यासारखा बनावट शिक्का तयार करील किंवा असा कोणताही बनावट शिक्का आपल्या कब्जात ठेवील किंवा कोणतेही प्रमाणभूत वजन किंवा माप अगर वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन यावरील शिक्का काढून घेऊन तो दुसरे वजन किंवा माप अगर वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन यावर बसवील किंवा अशा रीतीने शिक्का वठविलेले वजन किंवा माप जाणूनबुजून वाढवील किंवा कमी करील त्यास एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा होईल, किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.<br><br>(२) जी कोणतीही व्यक्ती असा खोटा किंवा बनावट शिक्का असलेले कोणतेही वजन किंवा माप अगर वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन किंवा अशा रीतीने वाढविलेले किंवा कमी केलेले वजन किंवा माप जाणूनबुजून वापरील, विकील, त्याची विल्हेवाट लावील किंवा ते विक्रीसाठी ठेवील त्यास सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. |

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३४. जी कोणतीही व्यक्ती,--

(क) त्याच्या ताब्यातील किंवा त्याच्या जागेतील कोणतेही वजन किंवा माप, अगर वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन किंवा त्यासंबंधीचे कोणतेही कागदपत्र किंवा अभिलेख, कलम १७ अन्वये तपासणीसाठी सादर करण्याचे नाकारील किंवा सादर करण्यात हयगय करील; किंवा

(ख) असे कोणतेही वजन, माप, साधन, कागदपत्र किंवा अभिलेख तपासण्याची किंवा बरोबर आहे की नाही हे पडताळून पाहण्याची निरीक्षकास परवानगी देण्याचे नाकारील; किंवा

(ग) कलम १७ अन्वये निरीक्षकाच्या प्रवेशास अडथळा आणील; किंवा

(घ) या अधिनियमान्वये आपली कर्तव्ये बजाविण्यात निरीक्षकास अडथळा करील किंवा व्यत्यय आणील;

तिला पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

तपासणीसाठी वजन किंवा माप, वगैरे हजर करण्यात हयगय करण्याबद्दल किंवा हजर करण्याचे नाकारण्याबद्दल शास्ती.

३५. जर कोणताही निरीक्षक, या अधिनियमाच्या किंवा तद्अन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करून, एखाद्या वजनावर किंवा मापावर अगर वजन करण्याच्या किंवा मापण्याच्या साधनावर जाणूनबुजून शिक्का वठविल किंवा या अधिनियमान्वये किंवा तद्अन्वये केलेल्या नियमान्वये त्याजवर सोपविण्यात आलेल्या कोणत्याही कर्तव्याचा भंग केल्याबद्दल दोषी असेल तर त्यास, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

निरीक्षकाने कर्तव्य भंग केल्याबद्दल शास्ती.

३६. या अधिनियमान्वये अधिकृत न केलेले कोणतेही वजन किंवा माप, अगर वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन राज्य शासनाकडे जमा होईल.

सरकारजमा करणे.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

३७. या अधिनियमान्वये नेमलेले नियंत्रक, उप-नियंत्रक, सहायक नियंत्रक आणि निरीक्षक हे भारतीय दंड संहितेच्या २१ व्या कलमाच्या अर्थानुसार लोक-सेवक आहेत असे समजण्यात येईल.

नियंत्रक, वगैरे लोकसेवक असणे.

३८. वजने व मापे यांचा नियंत्रक, किंवा कोणताही उप किंवा सहायक नियंत्रक किंवा कोणताही निरीक्षक किंवा कोणतीही इतर व्यक्ती हिच्याविरुद्ध या अधिनियमानुसार किंवा तद्अन्वये केलेल्या नियमांनुसार सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही कृत्याच्या बाबतीत, कोणताही दावा, खटला, किंवा अन्य कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

सद्भावनापूर्वक केलेल्या उपाय-योजनेस संरक्षण.

अपराधांची तडजोड करणे.

[१] ३८-क. (१) कलम २३ किंवा २५ खाली केलेल्या दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधाव्यतिरिक्त, कलम २३, २४, २५, २७, २८, ३२ किंवा ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची त्याबाबत खटला दाखल करण्यापूर्वी किंवा खटला दाखल केल्यानंतर, राज्य शासनाला किंवा राज्य शासनाने अधिकृत केलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्यास, राज्य शासनाला किंवा यथास्थिति अशा प्राधिकाऱ्यास योग्य वाटेल, अशी रक्कम दिल्यानंतर तडजोड करता येईल.

(२) अपराधी व्यक्तीने अशी रक्कम दिल्यानंतर जर ती अभिरक्षेत असेल तर तिला मुक्त करण्यात आले पाहिजे आणि जर अशा अपराधी व्यक्तीविरुद्ध त्या अपराधाबद्दल कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला भरण्यात आला असेल तर, अशा तडजोडीमुळे ती दोषमुक्त करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल आणि त्यानंतर तिच्याविरुद्ध अशा अपराधाबद्दल आणखी कोणतीही फौजदारी कार्यवाही करता येणार नाही.]

अपराधांची दखल घेणे, वगैरे.

३९. (१) नियंत्रकाने किंवा सामान्य अथवा विशेष आदेशाद्वारे नियंत्रकाने या बाबतीत अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने लेखी तक्रार केल्यावर असेल ते खेरीजकरून, कोणत्याही न्यायालयाने या अधिनियमान्वये शिक्षा होण्याजोग्या अपराधाची दखल घेता कामा नये.

(२) इलाखा फौजदारी न्यायाधिशाच्या किंवा पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशाच्या न्यायालयाहून कमी दर्जाच्या कोणत्याही न्यायालयाने या अधिनियमान्वये शिक्षा होण्याजोग्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करता कामा नये.

शिक्का वठविलेले वजन, वगैरे बिनचूक आहे असे गृहित धरणे.

४० या अधिनियमाच्या आणि तद्अन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींन्वये योग्यरीतीने शिक्का वठविलेले वजन किंवा माप किंवा वजन करण्याचे किंवा मापण्याचे साधन, जर ते स्वाधीन असणाऱ्या कोणत्याही निरीक्षकाकडून किंवा नियंत्रकाच्या सामान्य किंवा विशेष प्राधिकारान्वये काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून कोणत्याही न्यायालयात हजर करण्यात येईल तर, ते बरोबर नाही हे सिद्ध करण्यात येईपर्यंत बरोबर आहे असे गृहित धरण्यात येईल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

४१. (१) या अधिनियमान्वये अपराध करणारी व्यक्ती कंपनी असेल त्या बाबतीत, अपराध घडल्याच्या वेळी कंपनी स्वाधीन असणारा आणि कंपनीचा धंदा चालविण्याबद्दल कंपनीस जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती आणि त्याचप्रमाणे कंपनी ही अपराधाबद्दल दोषी आहेत असे समजण्यात आले पाहिजे आणि त्याजविरुद्ध कामकाज चालविले जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा केली जाण्यास ते पात्र होतील :

परंतु, या पोट-कलमातील कोणत्याही मजकुरामुळे, जर अशी कोणतीही व्यक्ती, असा अपराध तिच्या नकळत घडला असल्याचे किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने योग्य दक्षता घेतली असल्याचे सिद्ध करील तर ती अशा शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये कोणताही मजकूर असला तरी, कंपनीने या अधिनियमान्वये अपराध केला असेल आणि असा अपराध कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, चिटणीसाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे किंवा हयगय केल्यामुळे घडला असल्याचे सिद्ध झाले असेल त्या बाबतीत असा संचालक, व्यवस्थापक, चिटणीस किंवा इतर अधिकारी हे त्या अपराधाबद्दल दोषी आहेत असे समजण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कामकाज चालविले जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा केली जाण्यास ते पात्र होतील.

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १० द्वारे कलम ३८-क समाविष्ट करण्यात आले.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनासाठी --

(क) "कंपनी" याचा अर्थ, संस्थापित मंडळी, असा आहे आणि त्यात पेढी किंवा व्यक्तींचा इतर संघ यांचा समावेश होतो ; आणि

(ख) पेढीच्या संबंधात "संचालक" याचा अर्थ, पेढीचा भागीदार असा आहे.

**४२.** राज्य शासनाला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देण्याचा अधिकार आहे की, या अधिनियमान्वये किंवा तद्अन्वये केलेल्या नियमान्वये त्यास वापरता येणारा कोणताही अधिकार निदेशांत निर्दिष्ट करण्यात येतील अशा गोष्टींच्या संबंधात व अशा शर्तीस अधीन राहून, अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा राज्य शासनाच्या हाताखालच्या अधिकाऱ्यास किंवा प्राधिकाऱ्यासही वापरता येईल. — अधिकार सोपविणे.

१९५६ चा ८९. — **४३.** वजने व मापे यांच्या प्रमाणांबाबत अधिनियम, १९५६ अन्वये याबाबत जे नियम करण्यात येतील त्यांस अधीन राहून, राज्य शासनाला पुढील बाबतीत क्षम्य समजता येईल अशी चुकीची मर्यादा विहित करण्याचा अधिकार आहे,-- — वजनांत किंवा मापांत क्षम्य समजता येईल अशी चुकीची मर्यादा.

(क) कलम ३ मध्यें उल्लेख केलेली चालू प्रमाणे ;

(ख) कलम ४ मध्ये उल्लेख केलेली दुय्यम प्रमाणे ;

(ग) व्यापारविषयक वजने व मापे किंवा सामान्यत: वजनाने किंवा मापाने जिन्नस विकण्यात किंवा कोणताही व्यापार किंवा व्यापारांचा वर्ग यांच्या संबंधात ; आणि

(घ) वजन करण्याची व मापण्याची साधने.

**४४.** कोणत्याही क्षेत्रात किंवा उपक्रमाचा कोणताही वर्ग किंवा मालाचा कोणताही वर्ग यांच्या संबंधात कलम १, पोट-कलम (३) खालील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या सर्व तरतुदी किंवा त्यांपैकी कोणतीही तरतूद अंमलात आल्यावर कलम ४५ मधील तरतुदीस अधीन राहून,-- — सन १९३२ चा मुंबई अधिनियम १५ किंवा तत्सम कायदे लागू असण्याचे बंद होणे.

१९३२ चा मुंबई १५. — (क) मुंबई वजने व मापे अधिनियम, १९३२,

१९३२ चा मुंबई १५. — (ख) राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशात किंवा कच्छ प्रदेशात अंमलात असलेला मुंबई वजने व मापे अधिनियम, १९३२,

सन १३५६ चा हैद्राबाद १४. — (ग) हैद्राबाद वजने व मापे अधिनियम, १३५६ फसली,

सन १९२८ चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. — (घ) मध्यप्रांत व वऱ्हाड वजने व मापे अधिनियम, १९२८,

किंवा, यथास्थिति, अशा कोणत्याही कायद्याच्या ज्या तरतुदी अंमलात आणलेल्या या अधिनियमाच्या तरतुदींसमान असेल ती वगळून, असे क्षेत्र, उपक्रमाचा वर्ग किंवा मालाचा वर्ग यांच्या संबंधात लागू असण्याचे बंद होईल ; आणि अशा रीतीने लागू असल्याचे बंद झाल्यावर मुंबई साधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ याची कलमे ७ व २५ ही मुंबई अधिनियमान्वये एखादा अधिनियम रद्द करण्याच्या बाबतीत किंवा तो रद्द करण्याच्या व पुन्हा अधिनियमित करण्याच्या बाबतीत ज्याप्रमाणे लागू असतात त्याचप्रमाणे ती लागू होतील.

सन १९०४ चा मुंबई १.

सन १९५६ चा अधिनियम ८९ याच्या कलम १४ अन्वये ज्या मुदतीपर्यंत इतर वजने व मापे वापरण्याची परवानगी देण्यात आली असेल त्या मुदतीत विशेष तरतूद

**४५.** या अधिनियमाच्या सर्व तरतुदी किंवा त्यांपैकी कोणतीही तरतूद कोणत्याही क्षेत्रात, किंवा मालाच्या किंवा उपक्रमाच्या कोणत्याही वर्गाच्या संबंधात अंमलात आली तरी, केंद्र सरकारने वजने व मापें यांच्या प्रमाणाबाबत अधिनियम, १९५६ याच्या कलम १४ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करून विवक्षित मुदतीसाठी त्याच क्षेत्रात किंवा मालाच्या किंवा उपक्रमाच्या त्याच वर्गाच्या संबंधात (वस्तुमान व मापे यांची प्रमाणे याखेरीज आणखी) अधिसूचनेत निर्दिष्ट केलेली वजने व मापे वापरण्याचे चालू ठेवण्याची परवानगी दिली असेल (ज्यांचा या कलमात पुढे ''अधिक वजने व मापे'' असा उल्लेख केला आहे), तर ज्या मुदतीपर्यंत केंद्र सरकारने अधिक वजने व मापे वापरण्याची परवानगी दिली असेल ती मुदत संपेपर्यंत,--

(क) प्रमाणभूत वजने व मापे यांच्या संबंधीच्या या अधिनियमाच्या तरतुदी, त्या क्षेत्रात किंवा मालाच्या किंवा उपक्रमाच्या त्या वर्गाच्या संबंधात, अशा रीतीने वापरण्याची परवानगी दिलेली अधिक वजने व मापे यांस लागू होणार नाहीत ; आणि

(ख) कलम ४४ मध्ये निर्दिष्ट केलेले कायदे (यात तद्अन्वये केलेले कोणतेही नियम किंवा दिलेले कोणतेही आदेश यांचा समावेश होतो) अधिक वजने व मापे वापरण्याचे चालू ठेवण्याच्या कारणांकरिता व त्यास आनुषंगिक असलेल्या किंवा त्यांची योग्य अंमलबजावणी करण्याशी संबंध असलेल्या कोणत्याही कारणाकरिता त्या क्षेत्रात किंवा त्या मालाच्या किंवा उपक्रमाच्या वर्गाच्या संबंधात अंमलात राहतील ;

आणि उपरोक्त मुदत संपल्यावर, कलम ४४ मध्ये निर्दिष्ट केलेले कायदे, किंवा त्यांच्या संबंधित तरतुदी ह्या त्या कलमात तरतूद केलेल्या रीतीने व मर्यादेपर्यंत लागू असण्याचे बंद होतील.

नियम करण्याचा अधिकार.

**४६.** (१) या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी राज्य शासनास राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून नियम करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषत: आणि मागील अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता अशा नियमात पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही गोष्टींसाठी तरतूद करता येईल,--

(एक) चालू प्रमाणे ज्या पदार्थांची व ज्या नमुन्याप्रमाणे व वर्णनाप्रमाणे केली पाहिजेत ते पदार्थ व नमुने व ते वर्णन, ज्या कारखान्यांकडून ती तयार करून घेतली पाहिजेत तो कारखाना व कलम ३, पोट-कलम (२) अन्वये ज्या व्यक्तीने किंवा ज्या प्राधिकाऱ्याने आणि ज्या रीतीने अशा प्रमाणांवर शिक्का वठविला पाहिजे व तो अभिप्रमाणित केला पाहिजे ती व्यक्ती, तो प्राधिकारी व ती रीत ;

(दोन) कलम ३, पोट-कलम (३) अन्वये चालू प्रमाणे ज्या ठिकाणी, ज्या अभिरक्षेत व ज्या रीतीने ठेवली पाहिजेत ती ठिकाणे, ती अभिरक्षा व ती रीत ;

(तीन) कलम ३, पोट-कलम (४) अन्वये चालू प्रमाणावर ज्या व्यक्तींनी, ज्या ठिकाणी, ज्या कालांतराने व ज्या रीतीने निशाण्या केल्या पाहिजेत, त्या व्यक्ती, ती ठिकाणे, ती कालांतरे व ती रीत ;

(चार) जी चालू प्रमाणे सदोष झाली असतील ती चालू प्रमाणे कलम ३, पोट-कलम (६) अन्वये ज्या रीतीने ती बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहिले पाहिजे ती रीत ;

(पाच) कलम ४, पोट-कलम (२) अन्वये दुय्यम प्रमाणे ज्या पदार्थांची व ज्या नमुन्याप्रमाणे व वर्णनाप्रमाणे केली पाहिजेत ते पदार्थ, ते नमुने व ते वर्णन ;

(सहा) कलम ४, पोट-कलम (३) अन्वये दुय्यम प्रमाणे ज्या ठिकाणी, ज्या अभिरक्षेत व ज्या रीतीने ठेवली पाहिजेत ती ठिकाणे, ती अभिरक्षा व नी रीत ;

(सात) कलम ४, पोट-कलम (४) अन्वये ज्या रीतीने दुय्यम प्रमाणांवर ती बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहिल्याच्या दिनांकाची निशाणी केली पाहिजे ती रीत ;

(आठ) वजन करण्याच्या व मापण्याच्या साधनांची संख्या व प्रकार, आणि कलम ६, पोट-कलम (२) अन्वये ज्या रीतीने ती बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहिले पाहिजे व त्यांवर शिक्का वठविला पाहिजे ती रीत ;

(नऊ) व्यापरविषयक वजने व मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने ज्या पदार्थांची व ज्या नमुन्याप्रमाणे व वर्णनाप्रमाणे, केली पाहिजेत ते पदार्थ, ते नमुने व ते वर्णन आणि अशी वजने, मापे व साधने यांची विक्री ;

(दहा) कलम ९, अन्वये ज्या रीतीने व्यापारविषयक वजनांच्या व मापांच्या संज्ञेची निशाणी केली पाहिजे ती रीत ;

(अकरा) कलम १० अन्वये ज्या रीतीने व्यापारविषयक वजने किंवा मापे किंवा वजन करण्याची किंवा मापण्याची साधने बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहिले पाहिजे किंवा पुन्हा पडताळून पाहिले पाहिजे व त्यांवर शिक्का वठविला पाहिजे ती रीत ;

(बारा) कलम १३ अन्वये व्यापारविषयक वजने व मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने तयार करण्यासाठी, दुरुस्त करण्यासाठी व त्यांची विक्री करण्यासाठी ज्या नमुन्यात व ज्या रीतीने व ज्या शर्तींवर व्यक्तींना लायसने देता येतील तो नमुना, ती रीत व त्या शर्ती ;

(तेरा) कलम १५, पोट-कलम (१) अन्वये नियंत्रक, उप-नियंत्रक, सहायक नियंत्रक [१][ व निरीक्षक यांच्या आणि कलम १६, पोट-कलम (३) अन्वये नियुक्त करण्यात येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्याच्या ] पात्रता ;

---

१. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २८६ अनुसूची दहा याद्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(चौदा) कलम १६, पोट-कलम (२) अन्वये निरीक्षकांनी ज्या रीतीने वजने किंवा मापे किंवा वजन करण्याची किंवा मापण्याची साधने यावर शिक्का वठविला पाहिजे ती रीत :

(पंधरा) कलम १९, पोट-कलम (१) अन्वये वजने, मापे, वजन करण्याची साधने व मापण्याची साधने तयार करणारांनी, दुरुस्त करणारांनी व त्यांच्या व्यापाऱ्यांनी व ती वापरणाऱ्या व्यक्तींनी ठेवावयाचे दफ्तर व हिशेब, आणि असे दफ्तर व हिशेब ज्या रीतीने तपासण्यासाठी सादर केले पाहिजेत ती रीत ;

(सोळा) कलम २० अन्वये ज्या नमुन्यात व ज्या रीतीने अपिले दाखल करता येतील तो नमुना व ती रीत ;

(सतरा) कलम २१ अन्वये लायसन देण्यासाठी व व्यापारविषयक वजने व मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने ही बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहण्याबद्दल, त्यांवर निशाण्या करण्याबद्दल, शिक्का वठविण्याबद्दल व ती नीट करण्याबद्दल आकारावयाची फी ;

(अठरा) कलम ३२ अन्वये वजनाने किंवा मापाने वस्तूंची विक्री करताना क्षम्य समजता येईल अशी चुकीची मर्यादा ;

(एकोणीस) या अधिनियमान्वये जी वापरण्याचा अधिकार दिलेला नाही अशी वजने व मापे आणि वजन करण्याची व मापण्याची साधने ताब्यात घेणे, अटकावून ठेवणे व त्यांची विल्हेवाट लावणे ;

(वीस) कलम ४३ अन्वये दुय्यम व चालू प्रमाणे, व्यापारविषयक वजने व मापे, वजन करण्याची व मापण्याची साधने व सामान्यतः वस्तूंची विक्री यांच्या बाबतीत, किंवा कोणत्याही व्यापार किंवा व्यापाराचा प्रकार याच्या संबंधात क्षम्य समजता येईल अशी चुकीची मर्यादा ;

(एकवीस) विहित करावयाची किंवा करता येईल अशी इतर कोणतीही गोष्ट.

(३) या कलमान्वये कोणताही नियम करताना, राज्य शासनाला त्याचा भंग करणाऱ्यास पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल अशी तरतूद करता येईल.

(४) या कलमान्वये नियम करण्याचा अधिकार हा, राजपत्रात आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस अधीन असेल.

(५) या कलमान्वये केलेले सर्व नियम हे, विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे, असे नियम केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, ठेवले पाहिजेत, आणि अशा रीतीने ते ज्या अधिवेशनात ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा लगेच त्यानंतर येणाऱ्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यात जे फेरबदल करील त्या फेरबदलास ते अधीन असतील.

[१] [४६-क. या कलमातील कोणताही मजकूर, संघराज्याच्या सशस्त्र दलाच्या कोणत्याही संस्थेत किंवा युनिटात वापरण्यात येत असलेली वजने व मापे किंवा वजन करण्याची किंवा मापण्याची साधने यांच्याबाबतीत लागू होणार नाही.] संघराज्याच्या सशस्त्र दलाच्या संस्थेत किंवा युनिटात वापरण्यात येत असलेल्या वजनांच्या व मापांच्या बाबतीत अधिनियम लागू नसणे.

सन १९५८ चा मुंबई अध्यादेश २, रद्द करणे व व्यावृत्ती.

**४७.** (१) मुंबई वजने व मापे (अंमलबजावणी) अध्यादेश, १९५८ याद्वारे रद्द करण्यात येत आहे. सन १९५८ चा मुंबई आदेश क्रमांक दोन.

(२) अशा रीतीने रद्द झालेल्या अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही उपाययोजना ही (तीत कोणत्याही नेमणुका किंवा नियम करणे व आदेश देणे, अधिसूचना काढणे किंवा लायसन देणे व अपिले दाखल करणे यांचा समावेश होतो) जणू ज्या दिवशी अशी गोष्ट किंवा उपाययोजना करण्यात आली त्या दिवशी हा अधिनियम अंमलात होता, असे समजून करण्यात आली आहे असे समजले पाहिजे.

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, क्रमांक ११ द्वारे कलम ४६-क समाविष्ट करण्यात आले.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६.